# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. शबाना गैबीसो हळंगळी यांनी "शाहबानु खटल्याच्या निकालचे राजकारण आणि मुस्लिम महिलांचे प्रश्न" या विषयावरील संशोधनकार्य माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररीत्या केले असून ते समामाधनकारकरीत्या पूर्ण केले आहे. हा शोध प्रबंध ह्यापूर्वी कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

सदरचा प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (राज्यशास्त्र)पदवी परीक्षेसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : 21.08.10

(प्रा. डॉ. सौ. वासंती पी. रासम)
Prof. & Head.
Department of Political Science
Shivaji University, Kolhapur
संशोधन मार्गदर्शक



SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# प्रतिज्ञापत्र

"शाहबानु खटल्याच्या निकालचे राजकारण आणि मुस्लिम महिलांचे प्रश्न" ह्या विषयावरील प्रस्तुत शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल.(राज्यशास्त्र) पदवी परीक्षेसाठी लिहिला आहे. हा प्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : 21·08·10

(कु.शबाना गैबीसो हळंगळी)
संशोधक



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# ऋणनिर्देश

"शाहबानु खटल्याच्या निकालाचे राजकारण आणि मुस्लिम महिलांचे प्रश्न" या माझ्या एम.फिल. शोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी मला सतत ज्यांनी मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. तसेच सर्व प्रकारची वेळोवेळी मदत केली त्या सर्वांचे कृतज्ञतापुर्वक आभार मानने हे मी माझे कर्तव्य समजते. प्रबंधाच्या विषय निवडीपासून ते प्रबंधाचे कार्य पूर्णत्वाला जाण्यापर्यंत ज्यांचे मला बहूमोल असे मार्गदर्शन लाभले त्या माझ्या मातृतूल्य मार्गदर्शिका प्रा.डॉ.सौ.वासंती रासम यांची मी सदैव ऋणी आहे.

सदर प्रबंधासाठी मला मार्गदर्शन करणारे गुरूवर्य डॉ.अशोक चौसाळकर, प्रा.एफ.एच.बेन्नूर सर (सोलापूर), रझिया पटेल (स्त्री चळवळीच्या कार्यकर्त्या, पुणे), भोये सर, डॉ.अमिता कन्हेगावकर यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. त्याचबरोबर विभागातील अभिजित पाटील व शिरिश गवळी यांचीही मदत मिळाली. त्यांचीही मी आभारी आहे.

जिच्या इच्छेमुळे मी शिक्षण घेवू शकले ती माझी आई कै.हजमा गैबीसो हळंगळी तिचा आर्शीवाद सतत माझ्या पाठीशी राहिला. मला सतत प्रेरणा देणारे माझे वडिल श्री.गैबी हळंगळी, बहिण मदिना दिदी, भाऊ बापू हळंगळी यांच्या आजन्म ऋणातच राहीन.

हा शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी मला विद्यापीठातील डॉ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, संगणक विभाग तसेच पुण्यातील आलोचना ग्रंथालय यांची मला वेळोवेळी मदत झाली. त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. ह्या शोधप्रबंधांचे काम संगणकीकृत आणि वेळेवर पूर्ण करून देणारे अविनाश कांबळे आणि अरूण कांबळे यांचो मी आभारी आहे.

या शोधप्रबंधासाठी ज्यांची मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत झालो त्या सर्वांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानते!

धन्यवाद !

कु.शबाना गैबीसो हळंगळी

# अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | |
| पहिले | भारतीय राज्यघटना व मुस्लिम स्त्रिया | १ - ४६ |
| दुसरे | मुस्लिम व्यक्तिगत कायदा आणि स्त्रियांसाठी तरतूदी | ४७ -१०२ |
| तिसरे | शाहबानु खटला व मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न | १०३ - १४२ |
| चौथे | मुस्लिम स्त्री चळवळ आणि त्यांच्या अस्मितेचे राजकारण | १४३- १७२ |
| पाचवे | सारांश | १७३ - १८२ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | १८३ - १८६ |




BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# प्रस्तावना

# प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्यानंतर भारताने आपली स्वतंत्र अशी राज्यघटना निर्माण केली. ही राज्यघटना भारतीयांना समान समजून बनवण्यात आली. या राज्यघटनेचा सर्व भारतीयांनी स्विकार केला. घटनेच्या म्हणजेच संविधानाच्या सुरूवातीलाच 'आम्ही भारतीय जनता...' असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे घटनेच्या माध्यमातून भारतातील कोणत्याही व्यक्तिबाबत भेदभाव केला जात नाही. शिवाय भारतीय घटनेत समानतेचे तत्त्व स्विकारण्यात आले आहे. ही समानता जात, धर्म, लिंग सर्वांना समान संधी याबाबत आहे. भारतीय घटनेने भारतीय नागरिकांना सात प्रकारचे मूलभूत हक्क दिले आहेत. या सात प्रकारच्या मूलभूत हक्कानुसार प्रत्येक व्यक्तीला धर्माचे आचार, विचार, मतप्रदर्शन, शिक्षण, मालमत्ता धारण करण्याचे अधिकार दिलेत. या हक्कांवर आक्रमण झाल्यास न्यायालयात दाद मागता येते. घटनात्मक उपयांच्याद्वारे एखादी व्यक्ती आपल्या मूलभूत अधिकाराच्या संरक्षणासाठी न्यायालयात जावू शकते. भारतीय घटनेने समानतेच्या तत्त्वाबरोबर सर्व नागरिकांना समान कायदा लागू करण्याचे तत्त्व कलम ४४ मध्ये सांगितले आहे. समान नागरी कायदा लागू करण्याचे तत्त्व जरी घटनेत सांगितले असले तरी भारतात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी ह्या सर्व धर्माचे व्यक्तिगत कायदे वेगवेगळे आहेत. हे व्यक्तिगत कायदे पुरूषसंस्कृतीचा पुरस्कार करणारे आहेत. ते स्त्रियांना दुय्यम स्थान देणारे आहेत. शिवाय या कायद्यानुसार भारतीय स्त्रियांना न्याय हक्क प्राप्त होतीलच असे चित्र दिसून येत नाही. हिंदू कोडच्या माध्यमातून थोड्याप्रमाणात हिंदू स्त्रियांना काही अधिकार प्राप्त झाले पण तसे अधिकार ख्रिश्चन, पारशी, बौद्ध, विशेषत: मुस्लिम स्त्रियांना प्राप्त झाले नाहीत. ब्रिटीश कालखंडात व नंतरही भारतीय हिंदू स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी मोठ्याप्रमाणात कायदे व सुधारणा झाल्या. मुस्लिम धर्मात मात्र असे कायदे व सुधारणा स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी झाले नाहीत. उलट व्यक्तिगत कायदा पुढे करून मुस्लिम सनातनी लोकांनी नेहमीच मुस्लिम स्त्रियांच्या बाबतीत अत्याचार करणारे धोरण अवलंबून अन्याय केला आहे. मुस्लिम व्यक्तिगत कायदा हा कुराण

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रणित असल्याने त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. अशी मुस्लिम धर्मपंडितांनी भूमिका घेतल्यामुळे मुस्लिम स्त्रियांच्या अधिकाराचा प्रश्न बिकट बनत गेला. बहूपत्नीत्व, तलाक, पोटगी आणि अलीकडच्या काळामध्ये वाढलेला जुबानी तलाकचा प्रकार या सर्व प्रकारामुळे मुस्लिम स्त्रियांची अवस्था अत्यंत दयनीय बनली आहे.

मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न हे अलीकडच्या काळात अत्यंत प्रकर्षाने पुढे येत आहेत. पण मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न सोडवण्याऐवजी त्याचे भांडवलच किंबहूना राजकारणच बनवलं जात. मग ते कोणतेही कारण असो. त्यांना न्याय मिळावा अशा तरतूदी आजपर्यंत झालेल्या नाहीत. सत्ताधारी पक्ष, मुस्लिम नेते, धर्ममार्तंड पंडित, मुल्ला, मौलवी यांनी मुस्लिम स्त्रियांना न्यायापासून दूरच ठेवले आहे. कुराणचा चुकीचा अर्थ घेवून मुस्लिम समाजात गैरसमजुतीच फार मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे बहूपत्नीत्वाचे प्रमाण ही या समाजात वाढलेले दिसते. जुबानी तलाकमुळे तर कितीतरी मुस्लिम स्त्रियांचे जीवन अडचणीत आले आहे. कुराणने मुस्लिम स्त्रियांना कितीतरी चांगले अधिकार दिले आहेत. शिवाय स्त्री-पुरूष समानताही कुराणाने मानली आहे. प्रेषित महंमद पैगंबरांनी देखिल स्त्रियांना समाजामध्ये मानाचे स्थान दिले आहे. हे कुराणातील अनेक सुरे (आयात) मध्ये दिसून येते. असे असताना देखिल मुस्लिम सनातनी लोक स्त्रियांच्या अधिकारावर मर्यादा आणतात. जेंव्हा-जेंव्हा मुस्लिम स्त्री घटस्फोट, तलाक, वारसाहक्क, पोटगीसाठी न्यायालयात येते तेंव्हा-तेंव्हा व्यक्तिगत कायद्याची संकल्पना पुढे करून तिला मिळणाऱ्या न्यायापासून वंचित ठेवले जाते. म्हणून आजपर्यत मुस्लिम स्त्रिया न्यायासाठी झगडताना दिसतात.

## प्रस्तुत प्रबंधाचा उद्देश आणि संशोधन पद्धती :

भारतीय समाजामध्ये विविध जाती व धर्म आहेत. या जातीवर आधारीत भारतीय समाजाची विभागणी विविध स्तरामध्ये झालेली आहे. भारतामध्ये असणाऱ्या विविध जाती व धर्माच्या लोकांना एक समजून भारतीय राज्यघटनेची निर्मिती करण्यात आली. तसेच

प्रत्येक धर्मातील लोकांना त्यांच्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. भारतातील प्रत्येक धर्माचे व्यक्तिगत कायदे हे त्या-त्या धर्मावर आधारीत असल्याने या कायद्यातील कोणत्याही बदलाला येथील धार्मिक समाज तयार होत नाही. शिवाय भारतीय घटनेने समानतेचे तत्त्व स्वीकारून देखील भारतात समान नागरी कायदा अस्तित्वात आला नाही. १९८६ च्या शाहबानु खटल्यानंतर तर भारतीय समाजात समान नागरी कायद्याचा प्रश्न प्रकर्षाने पुढे आला. त्यातून मुस्लिम व्यक्तिगत कायद्याचा प्रश्न निर्माण झाला. न्यायालयांना कायद्याची व्याख्या व अर्थ लावण्याचा अधिकार असूनही शाहबानु खटल्यात न्यायालयाने दिलेल्या निर्णयाबाबत मुस्लिम व्यक्तिगत कायद्याची बाब पुढे आणून मुस्लिम सनातनी लोकांनी त्याला विरोध केला. या खटल्याच्या वेळी निर्माण झालेली परिस्थिती आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्न याचा प्रस्तुत प्रबंधात अभ्यास करण्यात आला आहे.

व्यक्तिगत कायदा आणि त्यामध्ये अंतर्भूत असणाऱ्या मुस्लिम स्त्रियांसाठीच्या तरतूदी अभ्यासणे. तसेच मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्या समस्या त्यांचे अधिकार काय आहेत. भारतीय राज्यघटनेत मुस्लिम स्त्रियांसाठी असणाऱ्या तरतूदींचा अभ्यास करण्यासाठी याविषयाची निवड करण्यात आली आहे. या विषयाचा अभ्यास करताना शाहबानु पोटगीचा प्रश्न हा मुस्लिम स्त्रियांच्या समस्येचं व त्यांना उद्‌भावणाऱ्या प्रश्नांच प्रतिक मानून शाहबानु खटल्याचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे. एकूणच मुस्लिम व्यक्तिगत कायदा, कुराणातील मुस्लिम स्त्रियांसाठी असणाऱ्या तरतूदी आणि शाहबानु खटल्यामागचे तत्कालीन राजकारण अभ्यासणे हा माझ्या प्रबंधाचा मुख्य उद्देश होता.

शहाबानु पोटगीचा खटला न्यायालयात आल्यानंतर यावेळी खऱ्या अर्थाने 'समान नागरी कायदा' चा प्रश्न अत्यंत प्रकर्षाने पुढे आला. याचवेळी झालेली गुजरातची दंगल, बाबरीमशीद राममंदीरचा प्रश्न या सर्वांना राजकीय स्वरूप देवून हे प्रकरण शाहबानु खटल्याशी जोडण्यात आले. यावेळी सत्तेवर असणाऱ्या कॉंग्रेसपक्षासहित इतर पक्षांनी केवळ मुस्लिम मतांकडे लक्ष ठेवून मुस्लिमांना लाभ होईल असा कोणताच कायदा केला नाही. या खटल्यातून मुस्लिम स्त्रियांचे अनेक प्रश्न पुढे आले. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आणि

स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व व अस्मिता टिकवण्यासाठी मुस्लिम महिला आंदोलनाची सुरवात झाली. मुस्लिम स्त्रियांच्या चळवळीचा अभ्यास करणे हा ही माझ्या प्रबंधाचा हेतू आहे.

## पूर्व संशोधन :

मुस्लिम पर्सनल लॉ-ताहीर मेहमुद, दास्तान भारतीय मुसलमानांची - अब्दुल कादर मुकादम, मुस्लिम जातीयतेचे स्वरूप कारणे व उपाय - हमीद दलवाई, The controversial of Shahabano Case – Asagar Ali Engineer, वर उल्लेखीत विविध प्रकाशित ग्रंथामधून मुस्लिम व्यक्तिगत कायदा, मुस्लिम महिलांचे प्रश्न, त्यांचे हक्क व समस्या यांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच शाहबानु खटल्याच्या बाबतीतही लिखाण झाले आहे पण शाहबानु खटला, मुस्लिम व्यक्तिगत कायदा, मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न, समस्या, हक्क या सर्वांचा एकत्रित अभ्यास झाला नाही. म्हणून मी माझ्या प्रबंधासाठी शाहबानु खटला तत्कालीन राजकारण, मुस्लिम महिलांचे प्रश्न, मुस्लिम स्त्रि चळवळ असा एकत्रित अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केली.

## संशोधन पद्धती :

या प्रबंधाच्या अभ्यासासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे करण्यात आला आहे. शिवाय दुय्यम साधनांच्या स्वरूपात मासिके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.